आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२६ सप्टेंबर २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून ३ परमरुद्र संगणकांचं लोकार्पण

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडून सियाचिनमधल्या लष्करी तळाची पाहणी

- राष्ट्रीय पोषण महिना उपक्रम राबविण्यात महाराष्ट्र आघाडीवर

**आणि**

- संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा समितीतल्या भारताच्या स्थायी सदस्यत्वाला फ्रान्सचे राष्ट्रपती इमॅन्युअल मॅक्रॉन यांचा जोरदार पाठिंबा

**<><><><><>**

संशोधनातून स्वावलंबन हाच आजचा आपला मंत्र बनला आहे. विज्ञानाचं महत्त्व केवळ शोध आणि विकासातच नाही तर प्रत्येकाच्या आशा-आकांक्षांना पूर्ण करण्यासाठी आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. हवामान आणि वातावरण बदलासाठीची उच्च क्षमता कम्प्युटिंग यंत्रणा असलेल्या पुणे इथल्या तीन परम रुद्र सुपर कॉम्प्युटिंग प्रणाली तसंच, उच्च कार्यक्षमतेच्या संगणकीय प्रणालीचं उद्घाटन त्यांनी दूरदृश्य पद्धतीनं केलं, त्यावेळी ते बोलत होते. भारत संगणकीय क्षेत्र तसंच विज्ञान-तंत्रज्ञानात स्वावलंबी होण्याच्या दिशेने हे महत्त्वाचं पाऊल असून डिजिटल क्रांतीच्या युगात संगणकीय क्षमता हा राष्ट्रीय क्षमतेचा पर्याय बनत असल्याचंही प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

राष्ट्रीय सुपरकॉम्प्युटिंग मिशन अंतर्गत सुमारे १३० कोटी रुपये किमतीचे आणि स्वदेशी बनावटीचे तीन परम रुद्र सुपर कॉम्प्युटर विकसित करण्यात आले आहेत. हे सुपर कॉम्प्युटर पुणे, दिल्ली आणि कोलकाता इथं संशोधनासाठी ठेवण्यात आले आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू लडाखच्या दौऱ्यावर असून आज त्यांनी सियाचिन इथल्या लष्करी तळाची पहाणी केली. सियाचिन ग्लेशियर इथं तैनात असलेले जवान आणि अधिकाऱ्यांशी राष्ट्रपतींनी संवाद साधला. सियाचिन इथल्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत राहून देशाचं रक्षण करणाऱ्या जवानांच्या शौर्याचं त्यांनी कौतुक केलं. तसंच या सैनिकांच्या कुटुंबांचे ही राष्ट्रपतींनी आभार मानले. सियाचिन लष्करी तळावर असलेल्या युद्ध स्मारकावर राष्ट्रपतींनी पुष्पांजली अर्पण करत त्यांना आदरांजली वाहिली.

माजी राष्ट्रपती डॉक्टर अब्दुल कलाम, रामनाथ कोविंद यांच्यानंतर सियाचिनला जाणाऱ्या  द्रौपदी मुर्मू या तिसऱ्या राष्ट्रपती आहेत.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं असंघटीत क्षेत्रातल्या कामगारांना देण्यात येणारा महागाई भत्ता वाढवला आहे. यामुळं अ श्रेणीतल्या कामगारांना दिवसाला १ हजार २८ रुपयांऐवजी १ हजार ३५ रुपये मिळतील. ब श्रेणीतल्यांना ९४८ रुपयांऐवजी ९५४ रुपये तर क श्रेणीतल्या कामगारांना ८६२ रुपयांऐवजी ९६८ रुपये दिवसाला मिळतील. १ ऑक्टोबरपासून हे दर लागू होणार आहेत.

**<><><><><>**

केंद्रीय महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या सातव्या राष्ट्रीय पोषण महिना उपक्रमा अंतर्गत आतापर्यंत ९ कोटी ६८ लाखांहून अधिक कार्यक्रमांचं आयोजन केलं आहे. यावर्षी राबवण्यात येत असलेल्या या अभियानात महाराष्ट्र, बिहार, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, गुजरात आणि आंध्र प्रदेश राज्यांनी चांगली कामगिरी केली असल्याचं मंत्रालयानं सांगितलं आहे.

ॲनिमिया प्रतिबंध, पौष्टिक आहार आणि कल्याणकारी अभियानांतर्गत सुमारे एक कोटी ८८ लाख कार्यक्रमांचं आयोजन केलं आहे. एक कोटी ४५ लाख कार्यक्रमांत पूरक आहार सेवनावर आधारीत होते. सरकारनं पोषण आहार जागृती अभियना अंतर्गत सुमारे एक कोटी ५९ लाख कार्यक्रम केले आहेत. पौष्टिक आहाराबरोबरच नागरिकांमध्ये पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करण्यावर भर देणारे उपक्रमही राबवल्याची माहिती महिला आणि बाल विकास मंत्रालयानं दिली.

**<><><><><>**

देशभरात सर्वत्र स्वच्छता अभियान राबवलं जातंय. या विषयी मुंबईतली विद्यार्थिनी प्रणाली  बोडेकर हिने केलेलं आवाहन आता ऐकूया…

**बाईट - प्रणाली बोडेकर( १२ सेकंद)**

**<><><><><>**

एक पेड मा के नाम अभियानात उत्तर प्रदेशात २६ कोटी झाडांची लागवड झाली. तर राजस्थाननं निर्धारित उद्दिष्ठाच्या अडीच पट झाडं लावल्याचं केंद्रीय पर्यावरण मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारतानं १ हजार ६३३ कोटी लिटर इतकी उच्चांकी इथेनॉल निर्मिती केली असल्याचं केंद्रीय अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी यांनी सांगितलं. ते आज नवी दिल्लीत भारतीय साखर आणि जैव उर्जा परिषदेचं उद्घाटन करताना बोलत होते. २०३० पर्यंत ५ टक्के बायोडिझेलचं लक्ष्य सरकारनं निश्चित केलं आहे, असं त्यांनी सांगितलं. देशात ऊसाचं उत्पादन ४० टक्क्यांनी वाढलं आहे. तर उत्पादकता १९ टक्क्यानं वाढलं आहे. हे क्षेत्र देशभरातल्या सुमारे साडेपाच कोटी शेतकऱ्यांचा आधार ठरलं आहे, असं ते म्हणाले.

<><><><>

जम्मू काश्मीरमधला दहशतवाद गाडून टाकण्यात आला असून आता दहशतवाद परत कधीच तोंड वर काढणार नाही, असा दावा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केला. ते आज जम्मू काश्मीरमधल्या उधमपूर जिल्ह्यातल्या चेनानी इथं विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठीच्या सभेत बोलत होते. जम्मू काश्मीरमधून ३७० कलम रद्दबातल करून ज्येष्ठ नेते श्यामाप्रसाद मुखर्जी यांचं स्वप्न पूर्ण केलं, असं शहा म्हणाले. शहा यांनी उधमपूरसह कठुवा आणि जम्मू जिल्ह्यातल्या पाच प्रचारसभांना संबोधित केलं. दरम्यान, जम्मू काश्मीरमध्ये तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यातलं मतदान १ ऑक्टोबर रोजी होणार आहे.

<><><><>

हरियाणामधल्या तरुणांसमोर बेरोजगारीचं आव्हान उभं राहिलं असून शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात भाजपा सरकार अपयशी ठरल्याची टीका

लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली आहे. हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी कर्नाल जिल्ह्यातल्या आसंध मतदारसंघात घेण्यात आलेल्या सभेत आज ते बोलत होते. राज्यात काँग्रेसचं सरकार आल्यावर शेतकऱ्यांना तीनशे युनिटपर्यंत वीज मोफत दिली जाईल, तसंच महिलांना दोन हजार रुपये पेन्शन दिली जाईल, असं आश्वासन गांधी यांनी दिलं.

**<><><><><>**

भारत आणि इंडोनेशिया परराष्ट्र मंत्रालयांची ८वी सल्लामसलत बैठक आज नवी दिल्लीत झाली. यावेळी दोन्ही देशांनी राजकीय देवाणघेवाण, संरक्षण आणि सुरक्षा, सागरी क्षेत्र, व्यापार आणि गुंतवणूक, आरोग्यसेवा आणि कनेक्टिव्हिटी यासह द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेतला. भारत-इंडोनेशिया राजनैतिक संबंधांना ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित विविध उपक्रमांवर यावेळी चर्चा झाली.

**<><><><><>**

संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा समितीत स्थायी सदस्य म्हणून भारताचा समावेश व्हावा यासाठी फ्रान्सचे राष्ट्रपती इमॅन्युअल मॅक्रॉन यांनी जोरदार पाठिंबा व्यक्त केला आहे. आज सकाळी न्युयॉर्क इथं संयुक्त राष्ट्रांच्या आम सभेच्या ७९ व्या अधिवेशनात त्यांनी सांगितलं, की भारत, जर्मनी, जपान आणि ब्राझील हे स्थायी सदस्य असले पाहिजेत. त्याबरोबरच आफ्रिकेतल्या दोन देशांनाही प्रतिनिधित्व मिळालं पाहिजे. सुरक्षा समिती अधिक प्रभावी आणि प्रातिनिधीक करण्यासाठी तिच्या सध्याच्या रचनेत सुधारणा करणं गरजेचं

आहे, असं ते म्हणाले. त्याआधी अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडन, रशियाचे परराष्ट्रमंत्री सर्जेई लाव्हरोव्ह, आणि चिलीचे अध्यक्ष ग्रॅब्रियेल बोरिक फोन्ट यांनी भारताला स्थाई सदस्यत्व मिळावं यासाठी पाठिंबा दर्शवला आहे.

**<><><><><>**

इस्त्रायलने लेबननमध्ये केलेल्या हवाई हल्ल्यात सहाशे पेक्षा जास्त जण ठार झाले आहेत. हिजबुल्लाहने इस्त्रालवर क्षेपणास्त्राचा मारा करत या हल्ल्याला प्रत्युत्तर दिलं आहे. अमेरिका, फ्रान्स आणि मित्र राष्ट्रांनी इस्त्रायल-लेबनन सीमेवर २१ दिवसांचा युद्धविराम घ्यावा, अशी मागणी केली आहे. अमेरिका, फ्रान्ससह युरोपियन युनियन, जर्मनी, सौदी अरेबिया, कतर आणि संयुक्त अरब अमिराती यांनी हे निवेदन केलं आहे. तर इस्त्रायलचे राष्ट्राध्यक्ष बेंजामीन नेत्यानाहू यांच्या कार्यालयानं इस्त्रायल संरक्षण दलाला अधिक जोमाने लढण्याचे निर्देश दिले आहेत.

दरम्यान, हिजबोल्लाह आणि इस्त्रायल संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारतीयांनी लेबननमध्ये प्रवास न करण्याचं आवाहन बैरुतमधल्या भारतीय दुतावासानं केलं आहे. पश्चिम आशियाई देशात प्रवास करू नये आणि लेबनन तात्काळ सोडावं असंही भारतीय दुतावासानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

मकाऊ खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकेरीत भारताच्या किदाम्बी श्रीकांतनं भारताच्याचं आयुष शेट्टीचा २१-१३, २१-१८ असा पराभव केला. महिला दुहेरीत भारताच्या गायत्री गोपीचंद आणि त्रिसा जॉली या जोडीनं

तैवानच्या लिन चिह-चुन आणि तेंग चुन-सुन यांचा २२-२०, २१-११ असा पराभव केला.

महिला एकेरीत भारताच्या तस्निम मीरला जपानच्या तोमोका मियाकाझीविरुद्ध १७-२१, २१-१३, १०-२१ असा पराभव पत्करावा लागला.

//<><><><><>//